**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स बारामती एग्रो लिमिटेड (युनिट-२), महात्मा फुले नगर, तालुका-कन्नड, जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५००.० टन/प्रतिदिन ते ७,५००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.७५ मेगावॅट प्रतिदिन वरुन २९.५ मेगावॅट पर्यत आणि "बी/सी" मोलॅसिस/शुगर केन ज्युस/सिरप/धान्यावर आधारित "रेक्टिफाईड स्पिरिट/एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल/इथेनॉल उत्पादनासाठी १५०.० कि.ली.प्रतिदिन नवीन आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. बारामती एग्रो लिमिटेड (युनिट-२), महात्मा फुले नगर, तालुका-कन्नड, जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५००.० टन/प्रतिदिन ते ७,५००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.७५ मेगावॅट प्रतिदिन वरुन २९.५ मेगावॅट पर्यत आणि "बी/सी" मोलॅसिस/शुगर केन ज्युस/सिरप/धान्यावर आधारित "रेक्टिफाईड स्पिरिट/एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल/इथेनॉल उत्पादनासाठी १५०.० कि.ली.प्रतिदिन नवीन आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ०८ ऑक्टोंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प परिसरात आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८१/२०२१,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९१४ एफटीएस-०१०४ दिनांक १४/०९/२०२१ सप्टेंबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली व मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पत्र क्र. ९०५ दि. ०२/१०/२०२१ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना प्राधिकृत केले आहे.

जाहीर लोकसुनावणीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ. अ. बा. गव्हाणे,
अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद
जिल्हा औरंगाबाद - **अध्यक्ष**

२) डॉ. प्रविण जोशी,
प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

३) श्री. प्र. द. वानखेडे
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद. - समन्वयक

सौ. सीमा मांगुलकर, क्षेत्र अधिकारी, यांनी श्री प्रदिप वानखेडे, उप प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यातर्फे श्री डॉ. अनंत गव्हाणे, अपर जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

त्यांनी सांगितले की कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना

जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजकांच्या वतीने त्यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजकांच्या वतीने क्षेत्र अधिकारी यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजकांच्या वतीने क्षेत्र अधिकारी यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स बारामती एग्रो लिमिटेड (युनिट-२), महात्मा फुले नगर, तालुका- कन्नड, जिल्हा - औरंगाबाद, महाराष्ट्र यांचा कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ४,५००.० टन/प्रतिदिन ते ७,५००.० टन/प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.७५ मेगावॅट प्रतिदिन वरुन २९.५ मेगावॅट पर्यत आणि "बी/सी" मोलॅसिस/शुगर केन ज्युस/सिरप/धान्यावर आधारित "रेक्टिफाईड स्पिरिट/एक्सट्रा न्युट्रल अल्कोहोल/इथेनॉल उत्पादनासाठी १५०.० कि.ली.प्रतिदिन नवीन आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - **श्रेणी अ मध्ये** [साखर

उत्पादनासाठी - ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी - १ (डी)] मोडत आहे.

क्षेत्र अधिकारी यांनी आयोजकांतर्फे असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास केंद्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक १७-०४-२०२१ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत ०६-०९-२०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना प्रसिध्द केली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय-औरंगाबाद, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - औरंगाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, औरंगाबाद, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद, तहसीलदार, तहसील कार्यालय -कन्नड, जिल्हा - औरंगाबाद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा-औरंगाबाद, नगराध्यक्ष, नगरपालिका कन्नड, दोंडगांव (विठ्ठलपूर), बहिरगांव (मालपूर), भोकनगांव, बनशेंद्रा/शिरसगाव, शिवराई, हतनूर, रेल (कनकावती), नावडी, मुंदवाडी, मकरणपूर, अंधानेर, नरसिंगपूर, हिवरखेडा (गौताळा), कुंजखेडा, तालुका - कन्नड, जिल्हा - औरंगाबाद, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - औरंगाबाद, उप प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ औरंगाबाद यांना दुस-या राज्यातून एकूण दोन सूचना/तक्रार/आक्षेप ईमेलव्दारे प्राप्त झालेले असून संबंधित सर्व सूचना/आक्षेप/तक्रारी कारखान्यास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत.

आयोजकांच्या वतीने क्षेत्र अधिकारी , यांनी सांगितले की उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्याच येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित पर्यावरण, वने व जलवायू मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल.

२

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये ४,८०० लाख आहे. तर कारखान्यासाठी आवर्ती खर्च रुपये १६४.० लाख एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

१) **श्री बाबासाहेब मोहिते, माजी सरपंच, अंधानेर, मुक्काम पोस्ट-अंधानेर, तालुका-कन्नड, जिल्हा-औरंगाबाद. (तालुका अध्यक्ष, कॉग्रेस कमिटी, कन्नड)**

मे. बारामती एग्रो लिमिटेड (युनिट-२) चे विस्तारिकरण योजिलेले आहे. त्यात नवीन आसवणी प्रकल्पाची स्थापना होणार आहे. याठिकाणी अत्यंत जास्तीच्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता लागणार आहे. त्या पाण्याची व्यवस्था आपण कुठल्याही शेतक-याला त्रास न होता जर केली, तर शेतक-यांच्या दृष्टीनेही ते चांगले राहिल आणि कारखान्याच्या दृष्टीनेही चांगले राहिल. यानंतर उत्पादनात जास्तीच्या प्रमाणात सांडपाणी निर्माण होईल, तर त्याची दुर्गंधी होऊ नये म्हणून केलेल्या उपाययोजना जनतेस सांगाव्यात. त्याचप्रमाणे कारखाना विस्तारिकरण आणि नवीन आसवणी प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे उत्पन्नात निश्चितच वाढ होईल, त्याचा फायदा येथील स्थानिक शेतक-यांना झाला पाहिजे आणि स्थानिकांनाच रोजगाराची संधि मिळावी ही विनंती.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पाणी व्यवस्थापन, रोजगार निर्मिती व स्थानिकांना फायदा/रोजगारात प्राधान्य याबाबत माहिती देण्याची सूचना केली.

प्रकल्प संचालक श्री. सुभाष गुळवे यांनी स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना उत्तर देताना सांगितले की श्री मोहिते यांनी अतिरिक्त सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावणार याबाबत प्रश्न विचारला. तर सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे जे सांडपाणी म्हणजे स्पेंट वॉश निर्माण होईल, ते प्रकल्पाबाहेर न सोडता इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पाबाहेर कुठलेही सांडपाणी जाणार नाही. घरगुती सांडपाणी सांडपाणी प्रक्रिया केंद्रात (Sewage Treatment Plant) व औद्योगिक सांडपाण्यावर सांडपाणी प्रकिया केंद्रात (Effluent Treatment Plant) आणि कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिटमध्ये (CPU) प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पातील सांडपाणी प्रकल्पाबाहेर जाणार नाही आणि त्याचा शेतक-यांना कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे.

दुसरा प्रश्न प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देणार आहे आहेत काय? तर या प्रकल्पात साधारणतः १००-१५० लोकांची गरज असते. त्यात तांत्रिक व्यक्तींची गरज लागते. जर स्थानिक तांत्रिक व्यक्ती असेल, तर त्या व्यक्तीस संधि देण्यात येईल. अन्यथा, आसवणी प्रकल्पात जे १००-१५० लोकांना रोजगाराची संधि देता येईल असे मी कारखान्याच्या वतीने आश्वासन देण्यात येते.

स्थानिकांनी पुढचा मुद्दा उपस्थित केला की आसवणी प्रकल्पामुळे वाढीव उत्पन्नाचा स्थानिक शेतक-यांना फायदा व्हावा. साखर उद्योगाची स्थिती पाहता आणि इथेनॉलला मागणी व केंद्र सरकार देत असलेला दर पाहता आसवणी प्रकल्प सुरु करण्याचे कारखाना व्यवस्थापनाने ठरविले. तर हाही नफा आपण सप्तर्थि रंगराजन समितीने सांगितल्याप्रमाणे म्हणजे नफ्यातील ७०% फायदा हा शेतक-यांना व उरलेला ३०% कारखान्याने प्रशासकीय खर्च, प्रकल्पातील खर्च करायचा आहे. त्यामुळे आसवणी प्रकल्प पुर्ण झाल्यावर निश्चितच स्थानिक शेतक-यांना ऊसाला जादा भाव मिळणार आहे. तो देण्यास आम्ही बांधिल आहोत.

प्रकल्पात आवश्यकतेनुसार कोळसा वापरणार आहोत. प्रामुख्याने बगॅसचाच वापर करणार आहोत. प्रदूषण होणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत. त्यातून उत्पन्न् राखेत पोटॅश असल्याने आणि ती ऊसाच्या शेतीसाठी फायद्याचे असल्याने काही प्रमाणात सवलत (डिस्काऊंड) देऊन सभासदांना उपलब्ध करुन देणार आहोत. त्याचप्रमाणे शेतक-यांच्या गरजेनुसार प्रेसमडही उपलब्ध करुन देण्यात येईल. अजून कोणाचाही शंका असल्यास त्या विचाराव्यात.

२) **<u>श्री शेखनाथ रामभाउ चव्हाण, माजी उप-सभापती, पंचायत समिती, कन्नड, मुक्काम पोस्ट-चिखलठाण,तालुका-कन्नड, जिल्हा - औरंगाबादः-</u>**

आमच्या गावातील शेतकरी अत्यंत कष्टाळू आहे, मात्र दुर्दैवाने गेले दोन वर्षे शेतीचे भाव पडलेले आहेत. यावर्षीच्या संकटाने सगळी पीके ही हातची गेलेली आहेत. तर आता ऊस या एकाच पीकाकडे शेतकरी आशेने पहात आहेत. कारखाना विस्तारिकरण करत आहे, त्याबद्द्ल कारखान्याचे अभिनंदन. मात्र शेतक-यांसाठी राख खत म्हणून वापरणात आहेत, त्याची क्षेत्रमर्यादा निश्चित असावी. जे शेतकरी कारखान्यास ऊसपुरवठा करतात, त्यां चा याचा फायदा व्हावा, एवढी दक्षता कारखान्याने घ्यावी. वाढीव उत्पन्नातून शेतक-यांनाही काही उत्पन्न मिळावे ही विनंती.

प्रकल्प संचालक श्री. सुभाष गुळवे यांनी उत्तर देताना सांगितले की कन्नड तालुक्याच्या लोकांनी ऊसक्षेत्र वाढवून सहकार्य केलेले आहे. त्यामुळे येथे कारखाना आश्वासित करतो की जो काही कारखान्याचा फायदा आहे आणि जे काही ऊसाचे क्षेत्र आहे, तर प्रथम कन्नड तालुक्यातील सर्वांचा ऊस प्रथम गाळला जाईल आणि कारखान्यातील उप-पदार्थामुळे जो काही फायदा कारखान्यास मिळत असेल, तो प्रथम कन्नड तालुक्यातील शेतक-यांनाच देण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्या काही अडचणी येतील, त्या कारखान्याच्या माध्यमातून सोडविल्या जातील.

प्रकल्प संचालक श्री. सुभाष गुळवे यांनी पुढे सांगितले की २०१६-१७ साली परिसरातील ओढ्या नाल्यावर २५ कि.मी. कारखान्याच्या माध्यमातून काम केले. लोकांच्या सहभागातून केले. त्यात सर्वात जास्त काम आपण आमदानेर भागात केले. भविष्यकाळात सी.एस.आर निधी अंतर्गत कन्न्ड तालुक्यातील व आसपासच्या गावातील जे काही काम असेल, ते प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

३) **<u>श्री किशोरअण्णा रंगनाथ वाळुंजे, सरपंच, रेल गृप ग्रामपंचायत, मुक्काम पोस्ट-कनकावती नगर, तालुका-कन्नड, जिल्हा-औरंगाबादः-</u>**

त्यांनी चांगल्याप्रकारचा उपक्रम राबववित आहात, म्हणून कारखाना प्रशासनाचे अभिनंदन केले. हा उपक्रम राबवत असताना जी रोजगार निर्मिती याठिकाणी होणार आहे, तरी तालुक्यातील व स्थानिक लोकांतर्फे आपणा विनंती आहे की आपण जे उपक्रम राहबित आहात, त्यात स्थानिकांना जास्त संधि उपलब्ध करुन देण्यात यावी. कारण २-३ एकराचे शेतकरी राहिलेच नाही. त्यामुळे मुलांना रोजगाराजी फारच आवश्यकता आहे. बाहेरच्या

तालुक्यात जाऊन काम करणे परवडत नाही. त्यांना येथे कमी पगारातही परवडते. तरी स्थानिकांना मोठ्या प्रमाणात नोक-या दाव्यात. आमचे सहकार्य नेहमीच राहिल.

प्रकल्प संचालकांनी सहकार्याबददल आभार मानले. स्थानिक युवकांविषयची तळमळ रास्त आहे. मात्र क्रशींग पॅटर्नप्रमाणे रोजगार उपलब्धी करावी लागत असल्याने कारखाना प्रशासनास मर्यादा आहेत.

४) **<u>श्री सिध्देश्वर पुंडलिकराव झाल्टे, सदस्य, जैतापूर ग्रामपंचायत, मुक्काम पोस्ट-जैतापुर, पोस्ट-हतनुर तालुका-कन्नड, जिल्हा-औरंगाबादः-</u>**

आताच बैठकीत सांगण्यात आले की प्रकल्पात रोजगार निर्मिती झालीच पाहिजे. बारामती एग्रो नवीन तंत्रज्ञान आत्मसात करते हे आनंदाची गोष्ट आहे. दुसरी गोष्ट अतिवृष्टीमुळे आमच्या ग्रामीण भागातील भरपूर रस्ते वाहून गेलेले आहेत. शेतकरी हवालदिल झालेले असून बारामती एग्रोकडे आशेने पहात आहे का त्यांच्या सहकार्याने ऊस कारखान्यात पोहचविणे शक्य होणार आहे. तरी कारखाना प्रशासनास विनंती आहे की त्यांनी याबाबत त्वरित सहकार्य करावे.

प्रकल्प संचालकांनी आश्वासन दिले की प्रकल्पातून एक जेसीबी आणि दोन ट्रॅक्टर उपलब्ध करुन देण्यात येतील. जर मुरुम उपलब्ध केल्यास ग्रामीण भागातील बांधावरील रस्त्यांची दुरुस्ती कारखान्याच्या माध्यमातून करण्यात येईल. मात्र मुख्य रस्ता दुरुस्त करणार नाही

प्रकल्प संचालकांनी सांगितले की लोकांची मागणी आहे की येथे शाळेची आवश्यकता आहे. तर ग्रामस्थांनी एक निवेदन कारखान्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावे व भविष्यात निश्चितच शैक्षणिक संकूल उभारण्याचा प्रयत्न कारखान्याकडून होऊ शकेल.

५) **<u>श्री शिवाजी थेटे, सदस्य, रेल गृप ग्रामपंचायत, मुक्काम पोस्ट-कनकावती नगर, तालुका-कन्न्ड, जिल्हा-औरंगाबाद (शिवसेना तालुका उपप्रमुखः-</u>**

आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करुन हा कारखाना चालू आहे. तालुक्यातील ऊस गाळप करतात, स्थानिकांना रोजीरोटी उपलब्ध झालेली आहे. मध्यंतरी चिमणीतून जी राख येत होती, ती परिसरातील लोकांना त्रासदायक झालेली होती. डोळ्यात कण जायचे. आता कारखाना परत चालू झाल्यावरच कळेल. तरी कारखाना प्रशासनास विनंती आहे की आसवणी प्रकल्पामुळे जी दुर्गंधी येते, ती आसपासच्या लोकांना होऊ नये. येथे वस्ती आहे. आपण येथे राहतात. आपले कामगार येथे राहतात. तरी अत्याधुनिक यंत्रणा स्थापित

करुन हा प्रकल्प उभारण्यात यावा, जेणेकरुन आजूबाजूच्या लोकांना त्रास होऊ नये. त्याचप्रमाणे प्रकल्प कारभारात शेतक-यांना सामावून घ्या. अतीवृष्टीमुळे शेतकरी हवादिल झालेला आहे. तर आमच्या शेताचा ताबा आपण घ्यावा, त्याचा ७/१२ मात्र शेतक-याकडेच ठेवण्यात यावा. शेतात प्रक्रिया राबवा. आमच्या खात्यात परस्पर पैसे जमा करण्यात यावे. पण आपण शेतक-यांच्या मदतीला धावून जा. आसवणी प्रकल्पास आमचा विरोध नाही. बैठकीत सांगितले की शिक्षणक्षेत्रात कन्नड तालुका अत्यंत मागे आहे. तरी शिक्षण संकुल येथे उभारा, तालुक्यातील गोरगरिबांना त्याचा लाभ होईल.

प्रकल्प संचालकानी सांगितले की नुसती साखर निर्माण करुन हा व्यवसाय चालणार नाही. या कारखान्यात दारू तयार होत नाही, तर इथेनॉल तयार होते. इथेनॉल पेट्रोलब्लेंडिंगमध्ये लागते. इथेनॉल म्हणजे इंधन तयार करणे, दारू तयार करत नाही. आपण केलेल्या सूचना आम्ही काटेकोरपण पाळू.

६) **डॉ. अनंत गव्हाणे, <u>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती-</u>** यांनी येते मत मांडले की जनहिताचे बरेच प्रश्न येथे विचारण्यात आले. स्थानिकांचे, येथील युवक, समाजातील इतर घटक यांचे हित झाले पाहिजे. तरी त्यांनी त्यांची बाजू मांडली. तरी प्रशासनाकडून आपणास विचारणा करण्यात येते की रेन वॉटर हारव्हेस्टींग, सोलर पॉवर व झाडे लावणे/हरितपट्टा विकास याबाबत आपले काय धोरण आहे?

प्रकल्प संचालकांनी सांगितले की प्रकल्पाच्या मागच्या बाजूस आम्ही मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे. प्रकल्पाचे अध्यक्षांच्या ६० व्या वाढदिवशी आम्ही ६० लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. कन्नड तालुक्याबरोबरच करमाळा, बारामती येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे. आपण केलेल्या सूचना राबवत आहोत. त्यांनी रेन वॉटर हार्व्हेस्टिंग योजनेबाबत माहिती देण्याची सूचना केली. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की रेन वॉटर हार्व्हेस्टिंग करुन आपण प्रकल्पातील पाण्याच्या बाबत स्वंयपुर्ण होणे आवश्यक आहे. गेले दोन वर्षे पाऊस चांगला पडत आहे. मात्र मराठवाडा ब-याचवेळा अत्यंत कमी पावसाचा भाग आहे. पाणी नसते. दुष्काळाचेच पंचनामे आम्ही करत असतो. यावर्षी पहिल्यांदाच अतिवृष्टीचे पंचनामे करत आहोत. त्यांनी रेन वॉटर हार्व्हेस्टींगचे संपूर्ण तपशील देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांना माहिती दिली की एकूण १६,७०० चौरस मीटर एवढ्या क्षेत्रात रेन वॉटर हार्वेस्टींग करणार आहोत, ज्यात साखरेचे गोडाऊन, कारखान्याची इमारत यावर आपण रेन वॉटर हार्वेस्टींग करणार आहोत. ते पाणी साठवून आपण त्या पाण्याची

साठवण करणार आहोत. त्याची एकूण क्षमता असेल ६,७०६ घनमीटर. येथील सरासरी पावसाचे प्रमाण हे ५०२ मिलीमीटर आहे. पाऊस जास्त झाल्यास आपल्याकडे साठवणची क्षमता जास्त आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी हरितपट्टा विकसनाबाबत माहिती देताना सांगितले की हरितपट्टा ३३% करणे बंधनकारकच आहे. त्यापेक्षा जास्त ३४% राखून ठेवलेले आहे. सध्या कारखान्यात २१,७२८ झाडे आहेत. तर १५०० झाडे प्रति हेक्टर आपण राबविणार आहोत. त्यामुळे आपणास कारखान्यात ३३,४५० झाडे लागणार आहेत. सध्या २१,७२८ झाडे आहेत. उर्वरित ११,७२८ झाडे आपण तीन वर्षात लावणार आहोत. या झाडांमध्ये नीलगीरी, लिंबे अशी मोठी झाडे असतील, त्यामुळे प्रदूषण हे कमीतकमी होईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढे विचारणा केली की मेलव्दारे सूचना आल्या होत्या. बाहेरच्या राज्यातूनही सूचना आलेल्या आहेत. त्या सुसंगत सूचना अशा आहेत की त्यात स्थानिकांचा रोजगाराचा मुद्दा आहे. एखादा प्रकल्प उभा राहिल्यानंतर त्यात स्थानिकांना जास्तीतजास्त न्याय मिळावा हे स्वाभाविक आहे. त्याल अनुसरु आपण बैठकीत आपले धोरण जाहीरही केले, त्याची अंमलबजावणी करावी. दुसरा मुद्दा की आपण सर्वांना नोकरी देऊ शकत नाही. पण तांत्रिक पदे नियुक्त करताना जर स्थानिक व्यक्तीकडे शैक्षणिक अहर्ता व सक्षम असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात यावे. अध्यक्षांनी स्थानिक युवक आणि युवतींसाठी कौशल्यविकास प्रशिक्षण हाती घेण्याची सूचना केली. त्याचा आपल्या कारखान्यात उपयोग नाही झाला तरी दुस-या क्षेत्रात होईल. स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत होईल आणि त्यांना दिशा मिळेल. अशी सूचना मेलव्दारे प्राप्त झाल्या असून त्या रास्त आहेत.

रस्त्यांच्या बाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला. फक्त रस्तेच नाहित,जर जी जी विकास कामे लोकांच्या गरजेची आहेत, ती कामे आपण सीएसआर निधीतून पूर्ण करण्यास आपला प्रकल्प प्राधान्य देईल अशी अपेक्षा आहे. याबाबत थोडक्यात सांगण्यात यावे.

प्रकल्प संचालकांनी सांगितले की २०१२ ला हा कारखाना घेतल्यानंतर आम्ही स्थानिक भागात फिरत होतो. आधिच्या व्यवस्थापनामुळे स्थानिक शेतकरी व लोक यांना त्रास होत होता. येथील कर्मचारी हा आम्ही १००% स्थानिकच घेतलेला आहे. त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आणि आज आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात बारामती एग्रो अग्रेसर आहे. आम्ही प्रकल्पात पेपरलेस काम करत आहोत. शेतक-याच्या बांधावर गेल्याशिवाय आमच्या सिस्टिमध्ये त्याची नोंद होतच नाही. त्याचप्रमाणे वजनकाट्याबाबतही शेतक-यास संदेश

जातो की विशिष्ट वेळी ट्रॅक्टर आला,एवढे वजने होते व विशिष्ट वेळी माल उतरविण्यात आला. वाहनचालकाने ट्रॅक्टमध्ये डिझेल भरल्यास त्याचीही नोंद घेण्यात येते. शेतक-याने फडातुन ऊस येईपर्यंत आम्ही मॅपिंग करत असतो. आम्ही अत्यंत पारदर्शकपणे व्यवस्था राबवत आहोत. जीपीएस सयंत्रणा लावण्याचे कारण येथे ट्रॅक्टर चोरीचे प्रमाण झालेले आहेत. कारखाना प्रशासनाने वजनकाट्याबाबत हेच धोरण अवलंबिलेले आहे.

**<u>७)डॉ. प्रवीण एम. जोशी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

बैठकीत धुराच्या उपद्रवाचा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. तर आता जो इन्सिनरेटर बॉयलर लावणार आहात, त्याला ओसीएमएस लावण्यात यावा. त्याचप्रमाणे तुमच्या ऑपरेशन आणि देखभाल यावर भर देण्यात यावा. आता आपम ईएसपी कार्यान्वित केलेला आहे. त्याची वेळोवेळी तपासणी करावी, त्याचा विड्स चालतात की नाही ते पहावे. त्याचप्रमाणे ऑपरेशन आणि देखभालीसाठी राखीव निधी आरक्षित केला असल्यास ते सांगण्यात यावे. हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व जल प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यासाठी आपण काही तरतुद केलेली आहे काय? त्याचप्रमाणे ओसीएमएस नविन बॉयलरला लावणार आहात काय,त्याबाबत अहवालात उल्लेख नाही. कारण स्पेंट वॉश इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळणार, तर हवा प्रदूषण सयंत्रणेबाबत उल्लेख नाही. एक प्रदूषण आपण टाळाल, तर दुसरे होईल. आपल्या उपाययोजना सांगाव्यात.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आपण जी सूचना ईएसपी संदर्भात केली त्याबाबत प्रकल्प प्रवर्तकांतर्फे सांगू इच्छितो की जो इन्सिनरेटर बॉयलर प्रस्तापित करत आहोत, त्यामध्ये कोळसा आणि बगॅस अशा प्रकारची इंधनाची व्यवस्था आहे. पण आपल्याकडेच बगॅस उपलब्ध असल्याने आपण बारा महिने कारखाना चालेल तोपर्यंत वापरणार आहोत. अगदी आपत्कालिन परिस्थितीत कोळसा वापरणार आहोत. पण जो ईएसपी डिझाईन केलेला आहे तो हाय एश असणारा कोळसा आहे, त्याचे सर्व प्रमाण लक्षात घेऊनच ईएसपी हा डिझाईन केलेला आहे. त्यामुळे तो बगॅसला वापरताना त्याची कार्यक्षमता अजून वाढेल. त्यामुळे कुठलाही प्रकारचा धुर बाहेर पडणार नाही.

सदस्य यांनी सूचना केली की ईएसपी ऑपरेशन व देखभालीसाठी आपण काय तरतुद केलेली आहे काय याची माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्प असल्याने ओसीएमएस लावणे बंधनकारक आहे. याचा उल्लेख सादरीकरणात केलेला नाही. जर असेल तर सांगा, नाहीतर अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंद घेताना तरतुद करा.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ईएसपी साठी ८.६ कोटी रक्कमेची तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे देखभालीसाठी २० लाख रुपयांची तरतुद आहे. त्यात गरज भासल्यास अतिरिक्त खर्च करण्यात येईल.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की बॉयलरचा दरवर्षी जो शटडाऊन असतो, त्यामध्ये त्याचे inspection करण्यात येते, दुरुस्ती आवश्यक असल्यास ती करण्यात येते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अत्याधुनिक यंत्रणा स्थापित करण्यात यावी, जेणेकरून हा प्रश्न सुटेल.

८) **<u>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती -</u>**

अध्यक्षांनी प्रकल्पातील सौर उर्जेच्या नियोजनाबाबत माहिती देण्याची सूचना केली. त्यांनी मत व्यक्त केले की देशासमोर व राज्यासमोर वीजेचे संकट आहे तर, आपण वीजेबाबतही स्वयंपूर्ण राहावे. त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येते सहविद्युत प्रकल्प आहे. त्यावेळी अध्यक्षांनी भविष्यात तरतुद करण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की युनिट -१ मध्ये प्रशासकीय इमारतीस आम्ही १००% सौर ऊर्जा योजना राबविलेली आहे. त्यांनी भविष्यात राबविण्याची सूचना केली.

९) **<u>श्री अशोकराव दापके, सरपंच, अंधानेर, मुक्काम पोस्ट-अंधानेर, तालुका - कन्नड, जिल्हा-औरंगाबादः-</u>**

त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती व सर्वांचे स्वागत करुन कारखान्यामुळे परिसरातील विकासास हातभार लागत असल्याची माहिती दिली. बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दयाचांही ऊहापोह केला.

प्रकल्प संचालक यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना काटेकोरपणे पाळण्याचे आश्वासन दिले. त्यांनी स्थानिक शेतक-यांना जास्तीत जास्त ऊस पिकवावा, त्याचे गाळप करण्यात येईल असे सांगितले. आपण चांगला ऊस पिकवा, आपले उत्पन्न वाढवा. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी ज्याप्रमाणे नवीन तंत्रज्ञान वापरतो, तसा येथील शेतकरी ते वापरत नाही. त्यामुळे ऊसाची उत्पादकता कमी आहे.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की कारखान्याने येथील शेतक-यांना याबाबत मार्गदर्शन करावे.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही जनसुनावणी पूर्वनियोजित होती. स्थानिकांनी चांगलाच प्रतिसाद दिलेला आहे. उपस्थितांनी प्रश्न चांगले विचारले, त्याची समपर्क उत्तरे देण्यात आली. या सर्व बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आलेले असून खेळीमेळीच्या वातावरणात शंका विचारण्यात आल्या. त्यांनी जनसुनावणी बैठक संपन्न् झाल्याचे घोषित केले.

सुनावणीपुर्वी या कार्यालयास एकुण ०२ सुचना अनुक्रमे दि. २७/०९/२०२१, श्री व्ही सुनंदा रेडी, तेलंगणा, श्री. रंगाराव कोथाकोंडा, तेलंगणा यांच्या मार्फत ई-मेल द्वारे प्राप्त झालेली असुन त्यामध्ये प्रकल्प उभारताना काही सूचना केलेल्या आहेत. या सर्व सुचना प्रकल्प धारकास या कार्यालयाने योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविलेल्या आहेत.

डॉ. राजेश औटी, क्षेत्र अधिकारी यांनी जनसुनावणी समितीचे व उपस्थित असलेल्या ग्रामस्थांचे तसेच कारखाना प्रतिनिधी व कारखाना व्यवस्थापनाचे मंडळाच्या वतीने आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदरील पर्यावरण विषय जनसुनावणीचे कामकाज संपन्न झाल्याचे घोषीत केले.

**(प्रदिप वानखेडे)**
आयोजक,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

**(डॉ. प्रवीण म. जोशी)**
सदस्य,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,
औरंगाबाद

**(डॉ. अनंत गव्हाणे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अप्पर, जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जिल्हा-औरंगाबाद

211007-FTS-0110

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone : 24010437/24020781
/24037124/24035273
Fax : 24044532/24024068 /24023516
Email : jdwater@mpcb.gov.in
Visit At : http://mpcb.gov.in

Kalpataru Point, 3rd & 4th floor,
Sion- Matunga Scheme Road No. 8,
Opp. Cine Planet Cinema,
Near Sion Circle, Sion (E),
Mumbai – 400022.

"Your Service is our Duty"

No. BO/JD (WPC)/PH/B- 210914-FTS-0104 Date: 14 / 09 /2021

**OFFICE ORDER NO. E- 81 OF 2021**

**Ref: Office Memorandum issued by MoEF & CC vide No F. No. 22-25/2020.IA.III dtd 09.06.2021.**

In compliance of Notification S. O. 1533 dt. 14/09/2006 and amended Notification S.O. 3067 (E) dt. 01/12/2009 of Ministry of Environment and Forests, Government of India, the Public Hearing Panel in respect of **Proposed Expansion of Sugarcane Crushing Capacity from 4500 TCD to 7500 TCD, Co-generation power plant capacity from 14.75 MW to 29.5 MW, and establishment of 150 KLPD Distillery to produce rectified spirit/extra neutral alcohol/Ethanol based on B"/C" Heavy Molasses/Sugarcane Juice/Syrup/Grains Proposed by Baramati Agro Limited (unit-2), at Mahatma Phule Nagar, Taluka-Kannad, Dist-Aurangabad. Maharashtra,** is as below;

| | | |
|---|---|---|
| 1) | **District Magistrate, Aurangabad** Or his representative not below the Rank of an Additional District Magistrate | Chairman |
| 2) | Representative of Maharashtra Pollution Control Board **Regional Officer, M.P C. Board, Aurangabad** | Member |
| 3) | **Sub Regional Officer, M. P. C. Board, Aurangabad Will work as:** | Convener |

The public hearing is proposed on **08.10.2021, Time-11.30 A.M.** The Public hearing shall be conducted in compliance with Office Memorandum issued on 09.06.2021 by MoEF&CC which should be followed strictly during public hearing.

The Members are requested to make it convenient to attend the Public Hearing dt- **08.10.2021, Time-11.30 A.M.** at Baramati Agro Limited (unit-2), at Mahatma Phule Nagar, Taluka-Kannad, Dist-Aurangabad (at Factory Premises), positively.

(Ashok Shingare, IAS)
Member Secretary

RO/SRO A'bad

Copy submitted for Information to:
1) The Principal Secretary, Environment Department, Govt. of Maharashtra, Mantralaya, Mumbai- 400 032.
2) The Chairman M. P. C. Board, Mumbai.

Copy for Information to:
District Collector, Aurangabad.

Copy for Information & necessary action to:
1) Regional Officer, M. P. C. Board, Aurangabad. - He is directed to bring the OM to notice of District Magistrate.

2) Sub Regional Officer, M. P. C. Board, Aurangabad - He is instructed to ensure that the copies are served to all concerned.
3) EIC, M. P. C. Board, Mumbai - For information & display on website. – Soft copy of Executive Summary sent to EIC section.

**Copy to project proponent:**
M/s. Baramati Agro Limited (unit-2), at Mahatma Phule Nagar, Taluka-Kannad, Dist-Aurangabad.

Times of India dt. 6/9/2021.

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## NOTICE FOR ENVIRONMENTAL PUBLIC HEARING

As per Ministry of Environment & Forest, Govt. of India Notification dtd. 14.09.2006, M/s. Baramati Agro Limited, (Unit-2), At Mahatma Phule Nagar, Tal. Kannad, Dist. Aurangabad have requested Maharashtra Pollution Control Board, to conduct public hearing from Environmental angle for their proposed Expansion of Sugarcane Crushing capacity from 4500 TCD to 7500 TCD, Co-Generation Power Plant Capacity from 14.75 MW to 29.5 MW and Establishment of 150 KLPD distillery to produce Rectified Spirit / Extra Neutral Alcohol / Ethanol baed on B"/C" Heavy Molasses / Sugarcane Juice / Syrup / Grains, All affected persons including bonafide residents, Environmental groups & others located nearby the project site can participate in the public hearing. Suggestions, views, comments of the public can be filed at the following address in writing within 30 days from the date of publication of this notice.

**Sub-Regional Office,**
**Maharashtra Pollution Control Board, Plot No. A-4/1,**
**"Paryavaran Bhawan" Behind Dainik Lokpatra, Chikalthana**
**MIDC Area, Aurangabad. Email: sroaurangabad1@mpcb.gov.in**
**Contact No. 9822013669**

Oral and written suggestions can also be presented during the Public Hearing to be conducted at

**Venue : M/s. Baramati Agro Limited, (Unit-2), At Mahatma Phule Nagar, Tal. Kannad, Dist. Aurangabad (At factory premises)**

**Date of Public Hearing: 08/10/2021**

**Time of Public Hearing: At 11.30 a.m.**

Copies of the Executive Summary containing the salient features of the project both in English and Marathi and other infomation / documents are available at the following offices.

1) Hon'ble District Collector, Aurangabad.
2) District Industries Centre, Aurangabad.
3) Zilha Parishad, Aurangabad
4) Tahsildar, Tahsil Office, Kannad, Tal. Kannad, Dist. Aurangabad.
5) Block Development Officer, Panchayat Sammittee Office, Kannad, Tal. Kannad Dist. Aurangabad.
6) Grampanchayat Office, Kannad, Daundgaon (Vitthapur), Bahirgaon (Malpur), Bhokangaon, Banshendra, Shirusgaon, Shivrai, Hatnur, Rel (Kankawali), Nawadi, Mundwadi, Makranpur, Andhaner, Narsingpur, Hivarkheda (Gautala), Kunjkheda, Tal. Kannad, Dist. Aurangabad.
7) Sub-Regional Office, Maharashtra Pollution Control Board, Plot No. A-4/1, MIDC Chikalthana, Aurangabad.
8) The Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Plot No. A-4/1, MIDC Chikalthana ,Aurangabad.
9) The Executive Engineer, MIDC, Railway Station Road, Aurangabad.
10) Maharashtra Pollution Control Board, Kalpataru Point, 2nd, 3rd & 4th floor, Sion Matunga Scheme Road No. 8, Sion (E), Mumbai 400 022.
11) Environment Department, Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai-32.
12) The Regional Office, Ministry of Environment, Forest & Climate Change, (WCZ), Ground floor, East Wing, New Secretariat Building, Civil Lines, Nagpur.

All the concerned persons will be provided access to the Executive Summary of the Project in English and Marathi alongwith EIA report during the office hours at all the above-mentioned places / offices.

It is to be noted the said public hearing will be conducted by following all COVID 19 SOPs issued by Govt. of Maharashtra. So all participants are requested to wear mask and maintain physical distancing as per standard operating procedure (SOP).

Sd/
(P. D. Wankhede)
Sub-Regional Officer,
M. P. C. Board, Aurangabad.

दै. सम्राट दि. ६।९।2021

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## पर्यावरणविषयक जाहीर सुनावणीची सूचना

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस.ओ. १५३३ दि. १४/०९/२००६ (दिनांक १/१२/२००९ सुधारीत)नुसार मे. बारामती ॲग्रो लिमिटेड (युनिट २). महात्मा फुले नगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांचे प्रस्तावित ऊसाची गाळप करण्याची क्षमता ४५०० टी.सि.डी.वरून ७५०० टी.सि.डी.पर्यंत व सह निर्मिती ऊर्जा क्षमता १४.७५ मेगावॅट ते २९.५ मेगावॅटपर्यंत वाढवणे तसेच "बी/सी" मोलासेस/शुगर केन ज्यूस / सिरप / धान्य वर आधारित 'रेक्टिफाइड स्पिरिट / एक्सट्रा न्यूट्रल अल्कोहोल/इथेनॉल उत्पादनासाठी १५० किलो प्रतिदिन डिस्टीलरीची स्थापनाविषयी पर्यावरणविषयक जाहीर लोक लोकसुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे अर्ज सादर केला आहे. सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोक सुनावणीचे आयोजन केले आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशांना सूचना, टिका-टिप्पणी लेखी स्वरूपात नोंदविता येतील. लेखी स्वरूपात सूचनाही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

उप-प्रादेशिक कार्यालय,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
प्लॉट नं. ओ-४/१, "पर्यावरण भवन",
दैनिक लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र, औरंगाबाद
ई-मेल - sroaurangabad1@mpcb.gov.in
संपर्क क्रमांक- ९८२२०१३६६९.

सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी लोकसुनावणीमध्ये आपला प्रत्यक्षरित्या सहभाग नोंदवू शकतात.

सुनावणीचे ठिकाण :- मे. बारामती ॲग्रो लिमिटेड (युनिट २). महात्मा फुले नगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद (उद्योगाच्या परिसरात)

सुनावणीची तारीख :- ०८.१०.२०२१

सुनावणीची वेळ :- सकाळी ११.३० वा.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालांच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (इंग्रजी व मराठी), पर्यावरण परिणाममूल्यांकन अहवालमध्ये खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

१.मा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.
२.जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद.
३. जिल्हा परिषद, औरंगाबाद.
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.
५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, ता. कन्नड, जि: औरंगाबाद.
६. ग्रामपंचायत कार्यालय, कन्नड, दोंडगाव (विठ्ठलपूर), बहिरगाव (मालपूर), भोकनगाव, बनशेंद्रा, शिरसगाव, शिवराई, हतनूर, रेल (कनकावटी), नावडी, गुंदवाडी, मकरणपूर, अंधानेर, नरसिंगपूर, हिवरखेडा (गौताळा), मुंजखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.
७. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. ओ-४/१, पर्यावरण भवन, लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा, औद्योगिक क्षेत्र, औरंगाबाद.
८. मा. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. ओ-४/१, पर्यावरण भवन, लोकपत्रच्या मागे. चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र, औरंगाबाद.
९. मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालय, रेल्वेस्टेशन रोड,औरंगाबाद.
१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
११. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

सदर पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी, महाराष्ट्र शासनाच्या कोवीड -१९ नियमाच्या अधीन राहून घेण्यात येईल. तसेच लोक सुनावणीसाठी हजर राहू इच्छित जनतेला नम्र विनंती की, त्यांनी तोंडावर मास्क घालावा व सोशल डिस्टंसिंग (योग्य ते अंतर) चे पालन करावे.

स्वाक्षरित/-
(प्र. द. वानखेडे)
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद.